**ठळक बातम्या**

- देशातला बेरोजगारीचा दर ३ पूर्णांक २ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आल्याची कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांची लोकसभेत माहिती

- जपानच्या टोकियो इथं आयोजित ‘क्वाड’ परिषदेत परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत एस. जयशंकर सहभागी

- शेअर बाजारांनी दिवसाच्या सुरुवातीला गाठली ८१ हजार ७४९ अंकांची विक्रमी पातळी

**आणि**

- इराणमध्ये झालेल्या भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारतीय विद्यार्थ्यांची दोन सुवर्ण आणि तीन रौप्यपदकांची कमाई

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आज केंद्रीय अर्थसंकल्पावरची चर्चा पुढे सुरू आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २३ जुलै रोजी अर्थसंकल्प सादर केला होता. त्यावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

देशात नोकऱ्यांची कमतरता नसून सरकारच्या विविध धोरणात्मक पावलांमुळे देशातला बेरोजगारीचा दर ३ पूर्णांक २ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आल्याचं प्रतिपादन कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत केलं. प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना ते उत्तर देत होते. येत्या काही वर्षांत बेरोजगारीचा दर ३ टक्क्यांच्या खाली येईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

प्रधानमंत्र्यांच्या पॅकेजमुळे येत्या पाच वर्षांत ४ कोटीपेक्षा जास्त युवकांना रोजगार आणि कौशल्यविकासाच्या संधी मिळतील, असं सांगून त्यांनी यंदाच्या अर्थसंकल्पाचं कौतुक केलं. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

दिल्ली इथल्या प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याच्या प्रकरणावर आज लोकसभेत चर्चा झाली. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी भाजपा आणि काँग्रेसने केली. दिल्ली सरकारच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना झाल्याचा आरोप भाजपा खासदार बांसुरी स्वराज यांनी आज शून्य प्रहरात केला. याच्या चौकशीसाठी गृह मंत्रालयानं एक समिती स्थापन करावी, अशी मागणी त्यांनी केली. काँग्रेसचे खासदार शशी थरूर, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, अपक्ष खासदार राजेश रंजन यांनीही या प्रकरणातल्या दोषींवर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली.

दरम्यान, या प्रकरणाचे पडसाद राज्यसभेतही उमटले. प्रशिक्षण केंद्रं हा व्यवसाय झाला असून याकडे लक्ष वेधण्यासाठी संक्षिप्त चर्चा घेण्यात यावी असं त्यांनी सुचवलं. याबाबत आपल्या दालनात सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक घेणार असल्याचं धनखड यांनी सांगितलं.

**<><><><>**

दिल्लीच्या ओल्ड राजिंदर नगर भागातल्या १३ नागरी सेवा प्रशिक्षण केंद्रांच्या तळघरांना दिल्ली महानगर पालिकेनं टाळं ठोकलं आहे. तळघरात सुरू असलेली तीन केंद्र बंद करण्यात आली असून राज्य सरकारनं चौकशीचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी आणखी पाच जणांना अटक केली असून एकूण आरोपींची संख्या सात झाली आहे.

**<><><><><>**

जपानच्या टोकियो इथं आयोजित ‘क्वाड’ परिषदेत परराष्ट्र मंत्र्यांची बैठक सुरू आहे. भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासह जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांचे परराष्ट्र मंत्री या बैठकीला उपस्थित आहेत. जागतिक पातळीवर आर्थिक वाढ करणं हे एक मोठं आव्हान असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर बदललेले आचार आणि विचार यांचा मेळ साधून प्रगती करता येऊ शकते. मानवनिर्मित किंवा नैसर्गिक संकटांवर मात करण्यासाठी सामूहिक पातळीवर प्रयत्नांची आवश्यकता आहे, असं डॉ. जयशंकर या वेळी म्हणाले. क्वाड परिषदेतल्या सदस्य देशांवरही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत. त्यामुळे परस्परांमधले संबंध दृढ होण्यासाठी परिपक्व राजकीय समज, आर्थिक भागीदारी, तंत्रज्ञानात सहभाग यामुळे ते साध्य होईल, असंही जयशंकर यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं ‘विकसित भारताच्या दिशेने वाटचाल - केंद्रीय अर्थसंकल्पोत्तर परिषदे’ला संबोधित करणार आहेत. कन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीनं या परिषदेचं आयोजन केलं आहे. सरकारच्या दूरदर्शी योजना आणि या प्रवासात उद्योगांची भूमिका याचा आराखडा सादर करण्याचा या परिषदेचा उद्देश आहे. उद्योग, सरकार, राजनैतिक अधिकारी, वैचारिक मंच यांच्यासह एक हजारापेक्षा जास्त जण या परिषदेत सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

भारत आणि सौदी अरेबिया या देशांनी, शुद्धीकरण, नवीकरणीय ऊर्जा आणि पेट्रोकेमिकल कारखान्यांसहित विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय गुंतवणूक वाढवण्यासंबंधी चर्चा केली. उभय देशांमध्ये झालेल्या उच्चस्तरीय कार्यबलाच्या पहिल्या बैठकीत दोन्ही देशांना फायदेशीर होईल, अशा पद्धतीने गुंतवणूक वाढवण्याच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून काल झालेल्या या बैठकीचं, प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव पी. के. मिश्रा आणि सौदी अरेबियाचे ऊर्जामंत्री प्रिन्स अब्दुलअजीज बिन सलमान बिन अब्दुलअजीज अल सौद यांनी संयुक्तपणे अध्यक्षपद भूषवलं.

**<><><><><>**

बिहारमधल्या नोकऱ्या आणि महाविद्यालयीन प्रवेशासाठीचं जाती आधारित ६५ टक्के आरक्षण रद्द करण्याच्या पाटणा उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. या प्रकरणात बिहार सरकारनं दाखल केलेल्या अपिलावर न्यायालयानं नोटीस बजावली असून यावर सप्टेंबर महिन्यात सुनावणी घेण्याचं मान्य केलं आहे.

मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि जमातीसाठी बिहारमधल्या नोकऱ्या आणि उच्च शिक्षण संस्थांमधलं आरक्षण ५० टक्क्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत वाढवणारी राज्य सरकारची अधिसूचना पाटणा उच्च न्यायालयानं गेल्या महिन्यात रद्द केली होती.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजार सकाळच्या सत्रात विक्रमी तेजीवर उघडला. सुरुवातीलाच सेन्सेक्सनं ८१ हजार ७४९ चा तर निफ्टीनं २४ हजार ९८० चा आतापर्यंतचा उच्चांक गाठला. छोट्या तसंच मध्यम शेअर्समध्येही तेजीचा परिणाम

दिसून येत आहे. अमेरिकन शेअर बाजारानं शुक्रवारी बंद होताना सकारात्मक तेजी गाठली होती. सर्व आशियाई शेअर बाजारात तेजीचा प्रभाव दिसून येत आहे.

**<><><><><>**

इराणमध्ये नुकत्याच झालेल्या ५४ व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये सहभागी झालेल्या भारताच्या सर्व पाच विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण आणि तीन रौप्यपदकांची कमाई केली आहे. रिदम केडिया आणि वेद लाहोटी यांनी सुवर्ण, तर आकर्ष राज सहाय, भव्या तिवारी आणि जयवारी सिंह यांनी रौप्यपदकावर नाव कोरलं. प्राध्यापक दीपक गर्ग आणि डॉ. शिरीष पाठारे यांनी भारताच्या चमूचं नेतृत्व केलं, तर प्राध्यापक ए. सी. बियाणी आणि प्राध्यापक विवेक भिडे यांनी निरीक्षक म्हणून काम केलं. भारतानं या स्पर्धेत चौथं स्थान पटकावलं. चीननं पहिला, रशियाना दुसरं, तर रोमानियानं पहिला क्रमांक मिळवला.

**<><><><><>**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चा चौथा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी आज नवी दिल्लीत ‘अखिल भारतीय शिक्षा समागम’ या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. या कार्यक्रमात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते शिक्षण विभागाच्या विविध उपक्रमांचं उद्घाटन होईल. शिक्षण धोरणाच्या वर्धापनदिनाचं औचित्य साधत शिक्षण विभाग आज वेगवेगळ्या भारतीय भाषा शिक्षणाला वाहिलेल्या दूरचित्रवाणी वाहिन्यां, दप्तराविना दहा दिवस, करिअरसंबधी सल्ला अशा वेगवेगळ्या उपक्रमांना सुरुवात करत आहे.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आजपासून विशेष लोकअदालत सप्ताहाचं आयोजन केलं जात आहे. न्यायालयात प्रलंबित असलेली

प्रकरणं निकाली काढणं, हा या सप्ताहाचा मुख्य हेतू असल्याचं न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. लोकअदालती, न्याय मिळवण्याचा सोपा आणि सुलभ मार्ग असल्यामुळे नागरिकांनी याचा फायदा घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. या उपक्रमाद्वारे स्वेच्छेनं आणि परस्पर सहमतीनं विवाद मिटवण्याची संधी मिळणार आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

जगभरात आज व्याघ्र दिन साजरा केला जात आहे. वाघांच्या नैसर्गिक अधिवासांच्या संवर्धनासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करणं, तसंच त्याबद्दल जनजागृती करणं आणि वाघांच्या संवर्धनात येणाऱ्या समस्यांवर विचार करणं या उद्देशानं हा दिवस साजरा केला जातो. जगातल्या एकूण वाघांपैकी ८० टक्के वाघ भारतात आढळतात. जागतिक वन्यजीव कोषाच्या माहितीनुसार भारतात वाघांची संख्या सतत वाढत आहे.

याच पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत पर्यावरण वन आणि हवामान बदल विभागाचे मंत्री भूपेंद्र यादव यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाची २५ वी बैठक पार पडली.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये आज नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत महिला गटात रमिता जिंदल आणि पुरुष गटात अर्जुन बबुता पदकासाठी मैदानात उतरणार आहेत. याव्यतिरिक्त बॅडमिंटन, नेमबाजी, टेनिस, हॉकी, तिरंदाजी, टेबल टेनिस या खेळांमध्येही वैयक्तिक आणि सांघिक प्रकारात भारताचे खेळाडू पुढच्या फेरीत प्रवेश करण्यासाठी लढत देतील.

**<><><><><>**

पुढच्या चार दिवसांत हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि पूर्व राजस्थानमध्ये हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. जम्मू काश्मीर, लडाख, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि पश्चिम राजस्थानमध्ये पुढच्या पाच दिवसांत तुरळक पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**